सकाळ



गणेश कला क्रीडा मंच, स्वारगेट : संगीत महोत्सवाचे उद्घाटन करताना डॉ. एल. सुब्रमण्यम. (डावीकडून) विश्वकर्माच्या विश्वस्त तृप्ती अगरवाल, अमिता अगरवाल, भरत अगरवाल, कुलगुरू डॉ. सिद्धार्थ जबडे व उपकुलगुरू गाडे.

# 'विश्वकर्मा'तर्फे संगीत महोत्सव

**पुणे :** विश्वकर्मा युनिव्हर्सिटीच्या सहयोगाने, लक्ष्मीनारायण ग्लोबल सेंटर ऑफ एक्सलन्सच्या संयुक्त विद्यमाने संगीतप्रेमींसाठी महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त संगीत महोत्सवाचे आयोजन केले होते. व्हायोलिन वादक डॉ. एल. सुब्रह्मण्यम यांचे वादन, त्यांच्या पत्नी कविता कृष्णमूर्ती यांचे गायन व स्पेनमधील कॅस्टिल आणि लियोनच्या सिंफनी ऑर्केस्ट्राने रसिक प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. डॉ. सुब्रह्मण्यम यांनी संगीताविषयी आवड असणाऱ्या भावी पिढीसाठी कार्यरत असल्याबद्दल विश्वकर्मा युनिव्हर्सिटीचे कौतुक केले. विश्वकर्माचे प्रमुख राजकुमार अगरवाल यांनी भारतीय संगीत लक्ष्मीनारायण ग्लोबल सेंटरच्या माध्यमाद्वारे जागतिक स्तरावर पोहोचविण्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाला विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Pune, Main
11/01/2020 Page No. 2